# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

क्रमांकः२/एनर्जीसी/मान्यता/२०१३/३३८
दिनांक : 7 MAR 2013

प्रति,
मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई - ४०० ०३२.

(लक्षवेधः श्री. म.मा.मोरवे, अवर सचिव)

विषयः- शैक्षणिक वर्ष २०१२-१३ साठी मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमाच्या शासन निर्णयातील नावामध्ये दुरुस्ती
के.जे.एज्युकेशनल इन्स्टिटयूटचे ट्रिनिटी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड रिसर्च, पुणे

संदर्भः- १. संस्थेचे पत्र क्र. केजेईआय/म.शासन/मंत्रालय/२०१२-१३/८३५ दि.३०.११.२०१२.
२. संस्थेचे पत्र क्र. केजेईआय/टीसीओईआर/डीटीईमुंबई/२०१३/ दि. ०१.०३.२०१३.

महोदय,

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, के.जे.एज्युकेशनल इन्स्टिटयूटचे ट्रिनिटी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड रिसर्च. पुणे, सर्व्हे नं. २५ व २७, पिसोली, ता.हवेली, जि.पुणे – ४११ ०४८ या संस्थेस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दि. १०.०५.२०१२ रोजीच्या पत्रान्वयें शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून मेकॅनिकल इंजिनिअरींग (थेट द्वितीय वर्ष) ६० प्रवेशक्षमतेसह तसेच इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन व मेकॅनिकल इंजिनिअरींग या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रत्येकी २४ प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने सदर अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाने शासन निर्णय क्र. टीईएम-२०१२/प्र.क्र.९८(भाग-१)/तांशि-४ दि. ३०.०६.२०१२. अन्वये मान्यता दिलेली आहे. सोबत प्रत जोडलेली आहे.

त्यानंतर अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दि. २८.०६.२०१२ रोजीच्या पत्रान्वयें अभ्यासक्रमाच्या नावात बदल करुन इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन व मेकॅनिकल इंजिनिअरींग या अभ्यासक्रमां ऐवजी डिजीटल सिस्टिम व हिट ॲन्ड पॉवर या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास मान्यता दिलेली आहे. सोबत प्रत जोडलेली आहे. सदर संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करीता इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन व मेकॅनिकल इंजिनिअरींग या अभ्यासक्रमां ऐवजी डिजीटल सिस्टिम व हिट ॲन्ड पॉवर या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने मान्यता दिली असल्याने व संस्थेने डिजीटल सिस्टिम व हिट ॲन्ड पॉवर या अभ्यासक्रमांस विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला असल्याने शासन मान्यता देण्याबाबत संदर्भाधित पत्रान्वये संस्थेने विनंती केलेली आहे.

संस्थेची विनंती विचारात घेऊन शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन व मेकॅनिकल इंजिनिअरींग या अभ्यासक्रमांऐवजी डिजीटल सिस्टिम व हिट ॲन्ड पॉवर या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास शासन मान्यता देण्यात यावी. व त्याप्रमाणे शासन शुध्दिपत्रक निर्गमित करण्यात यावे, ही विनंती.

आपला,

(डॉ.सुभाष महाजन)
प्र.संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

D:\sandhya\Mantralaya letter 12-13.doc

ISSUED 9259
DATE 8 MAR 2013
ISSUING CLERK